# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ९/०८/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३९६** — **विषय क्रमांक – ३९६**

**दिनांक- ९/०८/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३९६**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/४५/२०२३ दि.१४/०७/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १९९१ दि.१८/७/२०२३ अन्वये, सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील मनपाचे क क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये वाढ/ घट करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३९६**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/४५/२०२३ दि.१४/०७/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १९९१ दि.१८/७/२०२३ अन्वये, सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभागातील देखभाल दुरूस्ती करणेकामाच्या कामांना सन 2023 -24 च्या अंदाजपत्रका मध्ये अपुरी तरतुद असलेने सदरकामांच्या तरतुदी मध्ये वाढ / घट करणे आवश्यक आहे. ज्या कामामधून घट करावयाची आहे. ती खाली नमुद केलेली कामे ही विशेषयोजनेतील प्रकल्प अंतर्गत चालू आहेत. सदर चालू कामांसाठी सन 2023-24 च्या अंदाजपत्रकामध्ये सन 2023-24 मध्ये होणा-या खर्चाची आवश्यक लागणारी तरतुद करणेत आलेली आहे. व उर्वरित लागणारी तरतुद ही विभागामार्फत सन 2024-25 चे अंदाजपत्रकामध्ये करणेचे नियोजन विभागामार्फत करणेत आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थिती मध्ये सदर कामातून घट करणेत येणा-या कामे पुर्ण करणेसाठी अडचण निर्माण होणार नाही. सन 2023-24 चे अंदाजपत्रकामध्ये चालू असलेले प्रकल्पांना प्रमुख्याने तरतुदी ठेवणेत आले असलेने प्रभागातील देखभाल दुरूस्तीच्या कामांना पुरेशी तरतुद उपलब्ध झालेली नाही. सबब क क्षेत्रीय कार्यालयातील सन 2023-24 च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदी मध्ये खालील प्रमाणे वाढ/ घट करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र | सन 2023-24 चे | | लेखा शिर्ष | सन 2023-24 ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन 2023-24 साठी एकूण सुधारीत तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पा.क्र | अ.क्र | | | | | | |
| १ | प्रभाग क्र. 8 यशवंतराव चव्हाण चौक ते विश्वेश्वर चौकापर्यंतचा रस्ता अद्यायवत पध्दतीने करणे. (बजेट कोड – 222301430) | 8 | 66 | 153 | विशेष योजना | 15,88,90,000 | | 30,00,000 | 15,58,90,000 | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र.8 येथील सेंकेत हॉ टेल ते मराठा चेंबर्स पर्यंतचा रस्ता अद्ययावत पध्दतीने करणे. (बजेट कोड-222301404) | 8 | 52 | 18 8 | विशेष योजना | 13,39,38,000 | | 30,00,000 | 13,09,38,000 | |
| ३ | प्रभाग क्र.8 येथील इंद्रायणी चौक लगतचे जे ब्लॉक मधील रस्ते अद्ययावत पध्दतिने करणे. (बजेट कोड- 222300465) | 8 | 50 | 11 9 | विशेष योजना | 9,10,00,000 | | 30,00,000 | 8,80,00,000 | |
| ४ | प्रवागक्र.8 मधील एम.आय.डी.सी. मधील जे ब्लॉक मधील रस्ते अद्ययावत पध्दतिने करणे. (बजेट कोड - 222300467) | 8 | 50 | 12 1 | विशेष योजना | 8,00,00,000 | | 30,00,000 | 7,70,00,000 | |
| ५ | प्रभाग क्र. ८ मध्ये ठिकठिकाणी फुटपाथ व इतर स्थापत्य विषयक सुधारणा विषयक कामे करणे. (सन 2023-24) (बजेट कोड - 232400947) | 8 | 12 0 | 34 | भांड वली | 1,000 | 35,00,000 | 0 | 35,01,000 | |
| ६ | प्रभाग क्र.८ परीसरातील रस्ते WBM/BBM पद्धतीने करुन डांबरी करणे. (सन २०२३-२४) (बजेटकोड- 232400997) | 8 | 12 3 | 15 | भांड वली | 1,000 | 50,00,000 | 0 | 50,01,000 | |
| ७ | प्रभाग क्र. ८ मधील परिसरामध्ये सेक्टर 4 , 5 व इतर ठिकाणी स्थापत्य विषयक सुधारणा विषयक कामे करणे. (सन2023-24) (बजेट कोड 232400955) | 8 | 12 0 | 42 | भांड वली | 1,000 | 35,00,000 | 0 | 35,01,000 | |
| | एकुण | | | | | 46,38,31,000 | 1,20,00,000 | 1,20,00,000 | 1,20,03,000 | |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३९७** | **विषय क्रमांक – ३९७**

**दिनांक- ९/०८/२०२३** | **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३९७ दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३०४/२०२३ दि.१७/०७/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १९९९ दि.१८/७/२०२३ अन्वये, केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आकुर्डी येथे घरे बांधणे या विद्युत विषयक कामाकरीता आवश्यक तरतूद वर्गीकरण करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३९७ दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३०४/२०२३ दि.१७/०७/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १९९९ |

दि.१८/७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोहन नगर आकुर्डी येथे ५६८ घरे बांधण्यात आली आहेत. सदर विद्युत विषयक कामाकरीता अ क्षेत्रीय विद्युत विभागामार्फत निविदा नोटीस क्र.४४/०१--२२/२३, निविदा र.रु.५,३५,७९,३१०/- कामाचा आदेश क्र.-विमुका/०८/कावि/६२/२०२३ दिनांक-२४/०३/२०२३ मे.एस.एम. ईलेक्ट्रीक वर्क्स यांना निर्गत करण्यात आलेले आहे. सदर घरांसाठी विद्युत पुरवठा करणेकामी आवश्यक असणारा उच्चदाब वीजपुरवठा घेणेकामी जय गणेश व्हिजन आकुर्डी सब स्टेशन ते साईट वरील ट्रान्सफॉर्मर रुम पर्यंत उच्चदाब केबल टाकण्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच ट्रान्सफॉर्मर रुम ते प्रत्येक इमारतीच्या मीटर रुम पर्यंत लघुदाब केबल टाकण्याचे कामकाज हे पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच सदर कामातील जनरेटर चे Factory inspection पुर्ण झालेले आहे आणि रोहित्र संच सुद्धा उत्पादीत कंपनी मध्ये म.रा.वि.वि. कंपनीच्या टेस्टिंग कामी तयार आहे. सदर कामातून फायर फायटिंग व्यवस्था, स्ट्रीट लाईट पोल व इतर विद्युत विषयक इन्फ्रास्ट्रक्चर ची कामे ह्या कामातून करण्यात येणार आहे. सदर कामाकरिता सन २०२३ -२४ च्या अंदाजपत्रकामध्ये पानांक ४५२ अनुक्रमांक १७७ अन्वये र.रु.७ कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रु.२,००,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदर कामामध्ये आत्ता पर्यंत साईटवर पुर्ण करण्यात आलेल्या विद्युत विषयक कामापोटी सबंधित एजन्सीला दुस-या धावत्या बिलाच्या अनुषंगाने र.रु.१,९९,९१,३८३/- इतकी अदागायी करण्यात आली आहे. तसेच सदर उर्वरित विद्युत विषयक कामासाठी अ क्षेत्रीय विभागाकडे सन २०२३ -२४ च्या अंदाज पत्रकामध्ये अपुरी तरतूद आहे. मा.कार्यकारी अभियंता PMAY प्रकल्प विभाग यांनी जा.क्र.स्था./PMAY प्र./२७२/२०२३ दि.०६/०७/२०२३ रोजी विद्युत विषयक इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करण्यासाठी आकुर्डी प्रकल्पासाठी प्रत्येकी १ कोटी इतकी तरतूद उपलब्ध असल्याचे इकडील विभागास पत्रान्वये कळविले आहे. सदर कामास तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेच्या

| अ. क्र. | लेखाशीर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रक पानांक/ अनुक्र | बजेट | उपलब्ध तरतूद र.रु. | तरतूद वाढ र. रु. | तरतूद घट र. रु. | सुधारित तरतूद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन काम स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे | केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आकुर्डी येथे घरे बांधणे या कामांतर्गत विद्युत विषयक कामे कारणे. | ४५२/ १७७ | 222306656 | 20000000 | 10000000 | 0 | 30000000 |
| २ | Road pavements and concrete | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बो-हाडेवाडी येथे निवासी गाळे बांधणे. प्रकल्पामधील उर्वरित मुलभूत सुविधा (Infrastructure) विकसित करणे. | ५४/०९ | 232400180 | 10000000 | 0 | 5000000 | 5000000 |
| ३ | Road pavements and concrete | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी च-होली येथे निवासी गाळे बांधणे. प्रकल्पामधील उर्वरित मुलभूत सुविधा (Infrastructure) विकसित करणे. | ५४/२० | 232400191 | 15000000 | 0 | 5000000 | 10000000 |
| | | | | | 45000000 | 10000000 | 10000000 | 45000000 |

प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२**

| | |
|---|---|
| | **दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३९८** | **विषय क्रमांक – ३९८**

**दिनांक- ९/०८/२०२३** | **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३९८**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातंवि /०२/कावि/१५०/२०२३ दिनांक २६/०७/२०२३ अन्वये, मे.Bridgestone Ltd. कंपनीच्या अंतर्गत शहरात येणाऱ्या ट्रक चालकांसाठी स्वाथ्य व इतर सुविधा देण्याकरीता सारथी साहाय्य केंद्र स्थापित करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३९८**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातंवि /०२/कावि/१५०/२०२३ दिनांक २६/०७/२०२३ अन्वये, मे.Bridgestone Ltd. कंपनीकडील दि.०७ सप्टेंबर २०२२ रोजीच्या पत्रानुसार दि. ६ सप्टेंबर २०२२ रोजी आयुक्त तथा प्रशासक , श्रीमती राणू कुलश्रेष्ठ ,मे.Bridgestone Ltd. सी.एस.आर. प्रमुख, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी तथा सी.एस.आर.सेल प्रमुख, सी.एस.आर. सल्लागार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दरम्यान मे.Bridgestone Ltd. कंपनीच्या सी.एस.आर.अंतर्गत शहरात येणाऱ्या ट्रक चालकांसाठी स्वाथ्य व इतर सुविधा देण्याबाबत चर्चा झाली बाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड हे औद्योगिक शहर असल्याने भारताच्या विविध भागातून दिवसाला अंदाजे १७० ते १८० ट्रक्स शहरात प्रवेश करतात. शहरात येणाऱ्या बहुतांशी ट्रक्स या 'वाहतूक नगरी' (भक्ती शक्ती मागे) निगडी या परिसरात पार्किंग केले जाते. सदर पार्किंग ची जागा सेक्टर नं.२३ निगडी वाहतुक नगरी येथील आरक्षित असलेले वाहनतळ क्षेत्रफळ ११,६२० चौ.मी.(१२,५०७८ चौ. फु.) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मालकीची आहे. या व्यवसाय संबंधित असणारे अंदाजे ३५० ते ४०० व्यक्ती (प्रति दिन) हे या परिसरास भेट देत असतात. या परिसरात त्यांचा थांबा हा सर्वसाधारणपणे २४ ते ४८ तासांचा आहे. एका निरीक्षणानुसार अपुऱ्या आरोग्य सुविधा व व्यवसाय संबंधित जोखीम (Occupational Hazardous) मुळे या व्यवसायात गुंतलेल्या कामगार (चालक व सहाय्यक) यांचे पुढे शारिरिक व मानसिक आरोग्य दृष्ट्या अत्यंत बिकट अशा समस्या निर्माण होत असतात तसेच ते या समस्यांचे वाहक ही ठरू शकतात. ही बाब लक्षात घेऊन मे.Bridgestone Ltd या कंपनीने, शहरात प्रवेश करणाऱ्या व काही काळ वास्तव्य करणाऱ्या या व्यवसाया संबंधित असलेल्या कामगार (चालक व सहाय्यक) यांचे करिता शारीरिक,मानसिक, आरोग्य,शिक्षण व सुविधा इ. देण्यासाठी "सारथी साहाय्य केंद्र"तथा "जिजाऊ क्लिनीक"स्थापित करणेबाबत व पुढील तीन वर्ष कालावधीसाठी मे.Bridgestone Ltd. कंपनी विनामुल्य कार्यान्वित करणेस व तीन वर्षानंतर वैद्यकीय विभागाकडे हे केंद्र हस्तांतरित करणेस मा.स्थायी समितीच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांनी ठराव क्र. १२७२ दि.०८/०३/२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. |

| | |
|---|---|
| | **" सारथी साहाय्य केंद्र "**द्वारे मे. Bridgestone Ltd. ही कंपनी आपल्या सी.एस. आर. उपक्रमांतर्गत देशातील विविध भागातून येणाऱ्या ट्रक्स व्यवसाय संबंधित व्यक्तीसाठी मानसिक व शाररिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देते तसेच ट्रकचालकांच्या कल्याणासाठी आणि रस्ते सुरक्षिततेसाठी, तसेच त्यांची शारीरिक, मानसिक आणि वर्तणूक आरोग्य, काम जीवनचा ताळमेळ आणि परिवारासाठी वेळ, वैयक्तिक स्वच्छता, जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी याबाबतचे आरोग्य शिक्षण पुरविते. केंद्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाद्वारे या व्यावसायामधील लोकांमध्ये 'व्यक्तिगत प्रतिष्ठा व आदराची' या विषयी ची भावना निर्माण कशी होईल याबाबतचे प्रयत्न केले जाईल.<br><br>ह्या केंद्रा मार्फत खालील उपक्रम तसेच सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील :<br><br>· वैयक्तिक स्वच्छतेबाबत जागरूकता<br>· मुलभूत आरोग्य तपासणी<br>· डोळे तपासणी<br>· शैक्षणिक व वर्तवणूक उपक्रम<br>· त्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक मोहीम<br>· कौटुंबिक समुपदेशन आणि संबंध निर्माण करणे.<br>· मनोरंजन सुविधा.<br>· अल्कोहोलजन्य पदार्थ दुरुपयोग सत्रे आणि जागरूकता.<br>· HIV, AIDS आणि STD जागरूकता सत्रे.<br>· नियमित परस्परसंवादी सत्रे ज्यामध्ये चालकांमध्ये प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास निर्माण होईल.<br>· याचबरोबर सारथी सुविधा केंद्र चालकांचे शिक्षण आणि कौशल्य वाढविणे.<br><br>दि. ६ सप्टेंबर २०२२ रोजी सदर प्रस्तावाचे निवेदन व सादरीकरण कंपनीच्या सी.एस.आर. प्रमुख श्रीमती राणू कुलश्रेष्ठ व त्यांचे सहकारी यांना दिले. तसेच MoU (करारनामा) बाबत कायदा विभागाकडून दि.१०/११/२०२२ रोजी मसुद्यातील कायदेशीर बाबी तपासल्या आहेत. दि.०६/१२/२०२२ रोजी वैद्यकीय विभाग व भूमी आणि जिदंगी विभागाकडून अभिप्राय घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक व मे. Bridgestone Ltd.यामध्ये कंपनी अंतर्गत शहरात येणाऱ्या ट्रक चालकांसाठी स्वाथ्य व इतर सुविधा देण्याकरीता "सारथी साहाय्य केंद्र"तथा "जिजाऊ क्लिनीक" स्थापित करणेबाबत दि.२२ डिसेंबर २०२२ रोजी MoU (करारनामा) करणेत आला आहे.<br><br>तसेच मे. Bridgestone Ltd. यांचेकडील दि.०८ सप्टेंबर २०२२ रोजीचे प्राप्त ई-मेल नुसार या केंद्राकरिता लागणारी (२००० चौरस फूट/Sq.f) जागा तसेच पाणी व वीज यांच्या सुविधांसह महानगर पालिकेने पार्किंग परिसरात तीन वर्षा करिता विनामुल्य उपलब्ध करून |

| | |
|---|---|
| | द्यावी तसेच त्यावर मे.Bridgestone Ltd.कंपनी pre-fabricated पद्धतीने बांधकाम करून प्रामुख्याने ट्रक ( चालक व सहाय्यक) व जवळील झोपडपट्टी परिसरातील नागरीक यांचे करिता शारीरिक, मानसिक, आरोग्य, शिक्षण इ.सुविधा देण्यासाठी तसेच इतर Recreational Activitiesराबविण्या करिता " सारथी साहाय्य केंद्र " तथा "जिजाऊ क्लिनीक" या नावे Health and Wellness Center सुरु करेल व ते पुढील तीन वर्ष कालावधीसाठी विनामुल्य कार्यान्वित करणेस व तीन वर्षानंतर महानगरपालिका व कंपनी यांच्या मधील चर्चे नंतर वैद्यकीय विभागाकडे हे केंद्र हस्तांतरित केले जाईल. तरी "सारथी साहाय्य केंद्र" तथा "जिजाऊ क्लिनीक" स्थापित करण्यासाठी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३९९** **विषय क्रमांक – ३९९**

**दिनांक- ९/०८/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३९९**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/०७/कावि/३४२/२०२३ दि.३/८/२०२३ अन्वये, विभागीय अग्निशमन अधिकारी" या पदावर पदोन्नती मिळणेबाबत श्री.ऋषिकांत हिरामण चिपाडे, उप अग्निशमन अधिकारी यांचे विनंती अर्जानुसार अग्निशमन विभागाचे शिफारशीनुसार शासन मंजूरीकामी प्रस्ताव पाठविणेबाबत. |
| **ठराव क्र. ३९९**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/०७/कावि/३४२/२०२३ दि.३/८/२०२३ अन्वये, श्री.ऋषिकांत हिरामण चिपाडे, उप अग्निशमन अधिकारी यांनी त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार व अग्निशमन विभागामधील कामकाजाचे अनुभवानुसार विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर पदोन्नतीने समावेशन मिळणेकामी दिनांक -२२/०५/२०२३ रोजी विनंती अर्ज सादर केला आहे,अग्निशमन विभागामार्फत प्रस्ताव शिफारशीसह सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झालेला आहे.<br><br>महाराष्ट्र शासन राजपत्र,पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- २०२० दिनांक – १८ फेब्रुवारी २०२० अन्वये मंजुर झालेले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा प्रवेश नियमानुसार विभागीय अग्निशमन अधिकारी पदाचा पदोन्नती सोपान – उप अग्निशमन अधिकारी (गट –क) – अग्निशमन केंद्र अधिकारी ( गट – क) - सहा.विभागीय अग्निशमन अधिकारी (गट – क)- विभागीय अग्निशमन अधिकारी (गट- ब) असा आहे. अग्निशमन विभाग हा तातडीचा विभाग आहे, महापालिका आठ अग्निशमन केंद्रामधुन २४ तास कामकाज चालत आहे. पिंपरी चिंचवड शहर १८० चौ.कि.मी.व |

| | |
|---|---|
| | त्यालगतचे क्षेत्रातील नागरीकांचे जिवित व वित्त यांची आगीपासून सुरक्षा केली जाते. अग्निशमन विभागाकडे अत्यांतिक वर्द्या प्राप्त होत असतात, अग्निशमन विभागामध्ये प्रत्यक्ष आग विझवण्याचे व बचाव कार्य करण्याचे महत्त्वाचे कामकाज सक्षमपणे पार पाडले जाते.<br><br>सद्यस्थितीमध्ये अग्निशमन विभागामध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी – सहा.विभागीय अग्निशमन अधिकारी – विभागीय अग्निशमन अधिकारी या पदांवर महापालिकेमध्ये आवश्यक कर्मचारी/अधिकारी सद्यस्थितीत उपलब्ध नाहीत तसेच अग्निशमन विभागाकडील तातडीचे कामकाजाची अत्यावश्यकता व मनुष्यबळाचे अभावानुसार, अग्निशमन विभागाकडील कामकाजाचा अनुभव, शैक्षणिक अर्हता, तसेच विभागाकडील मनुष्यबळाची कमतरता यानुसार श्री.ऋषिकांत हिरामण चिपाडे, उप अग्निशमन अधिकारी (गट –क) (एस – १३ वेतनश्रेणी ३५४००-११२४०० ग्रेड पे ४२००) यांना विभागीय अग्निशमन अधिकारी (गट-ब) (एस – १५ वेतनश्रेणी ४१८००-१३२३०० ग्रेड पे ४६००) या पदावर पदोन्नतीने समायोजन करणेकामी नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन मंजूरीकामी प्रस्ताव पाठविणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४००** **विषय क्रमांक –४००**

**दिनांक- ९/०८/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४००**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. अग्नि/०५/कावि/१३२/२०२३ दि.१/८/२०२३ अन्वये, अग्निशमन विभागाचे वापराकरीता नव्याने खरेदी करणेत येणा-या वाहनांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता घेणे. |
| **ठराव क्र. ४००**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. अग्नि/०५/कावि/१३२/२०२३ दि.१/८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अग्निशामक विभाग हा मनपाचा नागरीकांचे जिवित व वित्तहानी वाचविणारा अग्निशमन सेवेचा एकमेव तातडिक आपत्कालीन विभाग आहे. या विभागाकडुन संपुर्ण मनपाचे १८० चौ.कि.मी. परीघ क्षेत्रामध्ये तसेच लगतचे क्षेत्रातही आग व अन्य बचाव ई. वर्द्यांवर अग्निशामक वाहने पाठविले जातात. ह्या करीता या विभागाचे पिंपरी, भोसरी, प्राधिकरण, रहाटणी, तळवडे, चिखली, थेरगाव व मोशी ह्या ०८ अग्निशमन केंद्र व त्यामध्ये विविध २७ अग्निशमन वाहनांच्या माध्यमातुन तीन पाळयांमध्ये २४ तास अखंड अग्निशमन विभाग कार्यरत आहे. अग्निशमन विभागास प्राप्त होणा-या विविध प्रकारच्या वर्दी संख्या व दिघी, पुनावळे,एमआयडीसी भोसरी व च-होली ह्या ठिकाणी नविन अग्निशमन केंद्राची इमारत उभारण्याचे कामकाजाची कार्यवाही चालू असल्याने, सध्यस्थितीत विभागाकडे उपलब्ध अग्निशमन वाहने अपुरे पडत असल्याने, नविन अग्निशमन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता विभागास आवश्यक असलेले विविध १० प्रकारचे एकुण १८ अग्निशमन वाहने खरेदी करुन अग्निशमन विभागास |

उपलब्ध करुन देणेकामी मनपा यांत्रिकी विभागास कळविले आहे.

पिंपरी चिंचवड शहराचा झपाट्याने होणारा विस्तार पाहता उपलब्ध असलेल्या अग्निशमन केंद्रामध्ये वापरात असणा-या वाहनांची संख्या कमी आहे. तसेच पुनावळे, भोसरी एमआयडीसी, च-होली, दिघी ह्या ठिकाणी सबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडून निविदा काढणेत आली असून, सदर ठिकाणी अग्निशमन केंद्र उभारणेचे कामकाज चालू आहे. अग्निशमन विभागास वर्षभरात १००० पेक्षा अधिक आगीचे व रेस्क्यू वर्दीच्या घटना घडतात. अग्निशमन विभागास प्राप्त होणा-या वर्दी संख्या, शहरामध्ये झपाट्याने वाढणारे उंच इमारती इ. करीता नविन अद्यावत अग्निशमन व बचाव कामकाज करणेकामी विभागाकडुन खालील प्रमाणे अग्निशमन वाहने खरेदी करुन मिळणे बाबत दि.२०/१/२०२२दि.२०/५/२०२२, दि.२०/६/२०२२, दि.२०/६/२०२३, दि.२८/१२/२०२२ व दि.२७/३/२०२३ रोजीचे पत्र व सभावृत्तांतान्वये मनपा यांत्रिकी विभागास कळविणेत आले होते.

| क्र. | वाहनाचा प्रकार | वाहनांची संख्या | वाहनांची अंदाजे र.रु | जीएसटी र.रु | अंदाजे र.रु |
|---|---|---|---|---|---|
| १ | फायर टेंडर | ०६ | १७५५०१७९७ | ३१५९०३२३ | २०७०९२१२० |
| २ | वॉटर टेंडर | ०३ | १३७२५८८६६ | २४७०६५९६ | १६१९६५४६२ |
| ३ | ॲडव्हॉन्स रेस्क्यु व्हॅन | ०२ | ८९७८१०३२ | १६१६०५८६ | १०५९४१६१८ |
| ४ | ७० मी. ए.एल.पी. | ०१ | २४६९५७२५० | ४४४५२३०५ | २९१४०९५५५ |
| ५ | ५४ मी. टी.टी.एल. | ०१ | २१५९४०३३७ | ३८८६९२६१ | २५४८०९५९८ |
| ६ | ३२ मी. टी.टी.एल. | ०१ | १८३५५३०६१ | ३३०३९५५१ | २१६५९२६१२ |
| ७ | डीसीपी टेंडर | ०१ | १०५००००० | १८९०००० | १२३९०००० |
| ८ | वॉटर फोम टेंडर | ०१ | २५२५०००० | ४५४५००० | २९७९५००० |
| ९ | फ्लड रेस्क्यु व्हॅन | ०१ | १५६००००० | २८०८००० | १८४०८००० |
| १० | बी.ए.सेट व्हॅन | ०१ | २३५३०७८१ | ४२३५५४१ | २७७६६३२२ |
| | एकुण | १८ | ११२३८७३१२४ | २०२२९७१६२ | १३२६१७०२८६ |
| | पुर्णांकित अंदाजीत रक्कम रुपये | | | | १३३,००,००,००० |

अग्निशमन विभागाचे सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकीय “ अग्निशमन वाहने खरेदी ” ह्या लेखाशिर्षावर र.रु ५५,००,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. उक्त वाहनांपैकी अ.क्र. १ ते ३ वाहन खरेदीचा खर्च सन २०२३-२४ चे उपलब्ध तदतुदी मधुन खर्ची करता येईल. तथापी, पुढील अन्य वाहनांच्या खरेदीच्या खर्चाकरीता सन २०२४-२५ मध्ये नव्याने तरतुद उपलब्ध करून देण्यात येईल. अग्निशमन विभागाच्या वरील तक्त्यातील विविध १० प्रकारच्या १८ अग्निशमन वाहनांच्या अंदाजीत र.रु, १३३,००,००,०००/- चे खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४०१** **विषय क्रमांक – ४०१**

**दिनांक- ९/०८/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४०१**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र साप्रवि/०७/कावि/३६६/२०२३ दिनांक - ०९/०८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा व सेवांचे वर्गीकरण,आकृतिबंधामध्ये मनपा आस्थापनेवरील शिपाई या पदास पदोन्नतीसाठी "हवालदार/जमादार" या पदाची नवनिर्मिती व मजूर या पदास पदोन्नती साखळी निर्माण करणेबाबत. |
| **ठराव क्र. ४०१**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र साप्रवि/०७/कावि/३६६/२०२३ दिनांक - ०९/०८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा व सेवांचे वर्गीकरण नियम यामध्ये शिपाई पदाच्या पदोन्नतीसाठी गट-ड संवर्गातील कर्मचारी यांनी विनंती मागणी अर्ज सादर केलेले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा व सेवांचे वर्गीकरण, आकृतिबंधामध्ये महापालिका आस्थापनेवरील शिपाई या पदास पदोन्नतीसाठी "हवालदार/ जमादार" या पदाची नवनिर्मिती करणे आवश्यक आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सेवा प्रवेश नियम मंजूर होण्या पुर्वीचे कालावधीमध्ये मजूर या पदास मुकादम व आरोग्य सहाय्यक या पदांची वेतनश्रेणी देण्यात येत होती. तथापि सेवा प्रवेश नियम- २०२० मंजूर झालेनंतर मुकादम व आरोग्य सहाय्यक ही पदे सार्वजनिक आरोग्य सेवा संवर्गामध्ये मंजूर करणेत आलेली आहेत. सेवा प्रवेश नियमांमध्ये मजूर हे एकाकी पद मंजूर असल्याने सदर पदास पदोन्नती साखळी मंजूर करणे आवश्यक आहे. सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०२० यामध्ये दुरुस्ती व सुधारणा करणेबाबत महापालिका स्तरावर बैठक घेण्यात आल्या होत्या. सदर बैठकींमध्ये कमिटीने घेतलेला निर्णय आणि मा.अध्यक्ष कर्मचारी महासंघ यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांमध्ये योग्य ती कार्यवाही होण्यासाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मुंबई येथे पाठविणे आवश्यक असलेने सोबतचे प्रपत्र अ व प्रपत्र ब नुसार प्रस्तावित केलेप्रमाणे मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४०२** **विषय क्रमांक – ४०२**

**दिनांक- ९/०८/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४०२**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .डक्षे/स्था/कावि/७०८/२०२३, दि.१८/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील वाकड येथील सर्व्हे नं.१६६/१/1 व सर्व्हे नं.१६४/७ या मिळकतीमधून जाणा-या १८.०० मी. रूंद डी.पी. रस्त्यास "कै.आर. बी. कलाटे मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४०२**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .डक्षे/स्था/कावि/७०८/२०२३, दि.१८/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील सर्व्हे नं.१६६/१/1 व सर्व्हे नं.१६४/७ या मिळकतीमधून जाणा-या १८.०० मी. रूंद डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र |

| | |
|---|---|
| | साधारणतः २० ते २५ गुंठे कै.राजाराम भिकाजी कलाटे व त्यांचे वारस यांनी मनपास रस्त्यासाठी हस्तांतरीत केलेले आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत वाकड गावाचा समावेश होण्यापुर्वीपासून कै.राजाराम भिकाजी कलाटे हे विविध सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत होते. त्यांनी अनेक गरीब पैलवानांना तालमीसाठी, तसेच त्यांच्या उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदत केली, मंदिर उभारण्यासाठी हातभार, दुग्ध व्यावसायाच्या माध्यमातून अनेक तरूणांना रोजगार उपलब्धी करून दिली. तसेच दुष्काळामध्ये जनावरांसाठीच्या छावण्यांना मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध करून दिला. पुर परिस्थितीत पिडीतांना तात्पुरता आसरा व त्यांना अन्न धान्यांची मदत केली आहे. अनाथ व गरजू मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत केली अशा प्रकारे सामाजिक क्षेत्रात त्यांनी भरीव काम केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण रहावे म्हणून सदर रस्त्यास "कै. आर. बी. कलाटे मार्ग" असे नामकरण करणेबाबतचा विषय सादर केलेला आहे. सदर रस्त्यास कै.आर.बी.कलाटे मार्ग असे नामकरण करणेची मागणी श्री.अमोल मल्हारी कलाटे यांनी व इतर स्थानिक नागरिक यांनी दि.२४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभागाकडे केलेली आहे. तसेच मा.आमदार, चिंचवड विधानसभा मतदार संघ, पुणे यांनी दि.१६/०६/२०२३ रोजीचे पत्रान्वये सदर बाधित रस्त्याला कै. राजाराम भिकाजी कलाटे (आर. बी. कलाटे) यांचे नाव देण्याबाबत मागणी केलेली आहे. सदर रस्त्यास नाव दिल्यास अर्जदार यांनी सदर रस्त्यामध्ये जाणारा जागा त्वरीत मनपास हस्तांतरीत करणे बंधनकारक असणार आहे. त्यानुसार प्रस्तावित केलेप्रमाणे नामकरणाच्या विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४०३** **विषय क्रमांक – ४०३**

**दिनांक- ९/०८/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४०३**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/८१२/२०२३, दिनांक ०९/०८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिंपळे गुरव येथील अत्याधुनिक स्किल बेस स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटरला "लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटर" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४०३**<br>**दिनांक-९/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/८१२/२०२३, दिनांक ०९/०८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका उद्योगनगरीतील तरूणांना रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात व विद्यार्थ्यांनी विशेष कौशल्य आत्मसात करण्याची गरज लक्षात घेता, रोजगार शोधणा-यांच्या क्षमतांचा विकास होण्याबरोबरच औद्योगिक क्षेत्रासाठी कार्यक्षम मनुष्यबळ निर्माण करणेकरिता लोकनेते स्व. आमदार लक्ष्मण जगताप साहेब यांच्या अथक प्रयत्नांतून स्मार्ट सिटी उपक्रमाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड मनपा व सावित्रीबाई फुले विद्यापीठ यांच्या वतीने, महाराष्ट्र शासन कौशल्य योजना विभागाच्या वतीने संयुक्तपणे पिंपळे गुरव येथील मनपाच्या माध्यमिक शाळा इमारतीत अत्याधुनिक स्किल बेस स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटर उभारणेत आलेले आहे. त्यामुळे उद्योगनगरीतील विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित शिक्षण व तरूणांना रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी अत्याधुनिक स्किल बेस स्मार्ट |

| | |
|---|---|
| | ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटर स्थापित करण्याचे लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप साहेबांचे स्वप्न साकार होत असून सदर अत्याधुनिक स्किल बेस स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटरला "लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटर" असे नामकरण करणेबाबत मा.आमदार, चिंचवड विधानसभा यांनी दि.१५/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. सबब सदर मौजे पिंपळे गुरव येथील अत्याधुनिक स्किल बेस स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटरला "लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप स्मार्ट ट्रेनिंग आणि इनोव्हेशन सेंटर" असे नामकरण करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**